# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २५९/२०२४ दिनांक:- १३/०७/२०२४.

## "Investment Scheme/Task Fraud द्वारे ऑनलाईन फसवणूक झालेल्या तक्रारदार यांना ४,९७,५२३/- रक्कम परत करण्यास सायबर पोलीस ठाणेस यश"

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कार्यक्षेत्रातील अर्नाळा पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे **श्री. सिन्हा** यांना विविध टास्कमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून सुरवातीला काही रक्कम अदा करुन विश्वास संपादन केला. त्यानंतर मोठया रक्कमेची गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल असे सांगुन तक्रारदार यांना वेळोवेळी रक्कम भरण्यास सांगुन तक्रारदार यांची आर्थिक फसवणुक केल्याबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रारी अर्ज प्राप्त झाल्याने सदरबाबत नोंद घेण्यात आलेली आहे.

**(सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्र.१०६४/२०२४ दिनांक ०१/०५/२०२४.)**

वरील प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने तक्रारदार यांचे व्यवहारचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यावर वळती झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदर प्राप्त माहितीच्या अनुषंगाने संबंधीत बँकेला पत्रव्यवहार करुन तक्रारदार यांची रक्कम खात्यात गोठविण्याबाबत कळविण्यात आले. तक्रारदार यांची रक्कम संशयीत खात्यांमध्ये गोठविण्याची माहिती प्राप्त होताच मा. न्यायाकडे तक्रारदार यांची रक्कम परत त्यांना मिळण्याकरीता कारवाई करण्यात आली. **मा. न्यायालयाकडे सदरबाबत पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी ४,९७,५२३/- रु रक्कम त्यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आलेली आहे.**

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **Telegram Channel, facebook,Instagram अथवा Watsapp वर जास्त परतावा देणा-या Promotional Adds वर विश्वास ठेवु नका. याद्वारे आपली आर्थिक फसवणुक होण्याची शक्यता आहे.**
- **अश्या प्रकारच्या फसवणुकीमध्ये Telegram Channel, Watsapp Group वर ॲड करुन तेथे इतरांना कसा फायदा होत आहे याचे Sceenshot, Massages दाखवुन पैसे गुंतवणुक करण्यास प्रवृत केले जाते. गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी सेबीची बनावट प्रमाणपत्रे दाखवुन फसवणुक करण्यात येते. एकदा गुंतवणुकदारांचा विश्वास जिंकला की, हे लोक गुंतवणुकदारांना जास्त व खात्रिशिर परताव्याची हमी देतात. अशा गुंतवणुकीमध्ये आर्थिक फसवणुक होण्याचा धोका मोठया प्रमाणात असतो.**
- **Work From Home नावाखाली Online Youtube Vedio Link Task, Hotel/Movie Rating या सारख्या गुंतवणुक करणा-या फसव्या जाहिरातींना बळी पडु नये.**
- **जास्त परतावा देण्याचे आमिष दाखविणा-या कोणत्याही ट्रेडिंग ॲपवर विश्वास ठेवु नये. तसचे ट्रेडिंग ॲपची विश्वासार्हता तपासुन गुंतवणुक करु नये.**
- **Share Market, Forex Trading, Crypto Investment, Mutual Funds मधील गुंतवणुक करण्याअगोदर आपल्या वितीय सल्लागारासोबत चर्चा करुनच गुंतवणुक करा.**
- **कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करुन नये.**
- **ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा १९३० या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, मपोअं/१३१०७ पल्लवी निकम, मपोअं/स्नेहल पुणे, मसुब/प्रविण सांवत यांनी पार पाडली आहे.

सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५.

सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

**--------0000-------**